# ऋणनिर्देश

प्रस्तुत शोधप्रबंध पूर्ण करुन सादर करत असताना मला अत्यंत आनंद होत आहे. या संशोधन विषयाचा अभ्यास प्रा. डॉ. भोसले आर.ए., अधिव्याख्याती, श्रीमती महाराणी ताराबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. संशोधन कार्याच्या अगदी सुरवातीपासून ते अखेरपर्यंत येणारी प्रत्येक अडचण सोडविण्यासाठी बहुमोलाचे मार्गदर्शन अगदी वेळोवेळी मिळाले. त्यांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन व प्रत्येक वेळी दिलेली प्रेरणा यामुळेच मी हा शोध प्रबंध पूर्ण करत शकलो. त्यामुळे प्रथमत: त्यांचा मी सदैव ऋणी आहे.

ह्या शोधनिबंधाचा अभ्यास करत असताना शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सौ. पद्मिनी मॅडम यांचे विशेष सहकार्य व प्रेरणा मिळाली. तसेच विशेषकरुन प्रा. डॉ. सौ. पाटील जी.एस. यांचे बहुमोल सहकार्य मिळाले. त्याबरोबर प्रा. डॉ. सौ. पाटणकर पी.एस., प्रा. डॉ. सौ. सप्रे एन.आर. प्रा. डॉ. कु. संकपाळ आर.यू. प्रा. डॉ. पाटील सर यांच्याकडून सहकार्य व प्रोत्साहन मिळाले. त्याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे.

तसेच प्रा. डॉ. श्री. भापकर डी.एस यांच्याकडून सहकार्य लाभले. तसेच ज्या प्राचार्यांनी मुलाखती दिल्या, ज्या शिक्षकांनी प्रश्नावल्या भरुन दिल्या त्या सर्वांचे मी विशेषकरुन आभार मानतो.

त्याशिवाय माझ्या प्रत्येक कार्यात सहकार्य करणारी माझी पत्नी प्रा. सौ. सुलभा गावडे (पुजारी) तसेच माझे कुटुंबीय, माझे प्राध्यापक सहकारी, मित्र यांच्या सहकार्यामुळे मी हा शोध प्रबंध पूर्णत्वास नेवू शकलो.

विशेषत: हे सर्व अक्षरबद्ध करुन देणारे माझे मित्र श्रीकांत कॉम्प्युटर्स यांनी स्वच्छ, सुंदर व वेळेत टंकलेखन करुन दिल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

ठिकाण –

दिनांक –

श्री. गावडे एम्.डी.

संशोधक